तरुण भारत
Apla Nagpur | 2023-11-23 | Page- 6
epaper.tarunbharat.net

# इलेक्ट्रॉनिक पेन्शन पेमेंट सुविधा उद्यापासून

**नागपूर** : नागपूर क्षेत्रातील निवृत्तीवेतनधारकांच्या कल्याण वृद्धी करिता प्रधान महालेखापाल कार्यालय नागपुर यांच्याव्दारे इलेक्ट्रॉनिक पेन्शन पेमेंट ऑर्डर्स - ई-पीपीओ  जारी करण्यात येणार असून एक पथदर्शी प्रकल्प म्हणून १ डिसेंबर पासून नागपूर जिल्ह्यातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांना ई-पीपीओ पाठविले जातील. पेन्शनर्सला अनुकूल असणाऱ्या या पुढाकाराचा शुभारंभ  महालेखापाल जया भगत, याच्या हस्ते २३ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता प्रधान महालेखापाल नागपुर कार्यालय येथे होणार आहे .ईपीपीओ या उपक्रमाव्दारे कोषागार अधिकाऱ्यांद्वारे पेन्शनचे वितरण सुव्यवस्थित व गतीने होण्याची अपेक्षा आहे.

# इलेक्ट्रॉनिक पेन्शन पेमेंटची सुविधा आजपासून

**सकाळ वृत्तसेवा**

नागपूर, ता. २२ : नागपूर विभागातील निवृत्तीवेतनधारकांच्या कल्याण वृद्धीकरिता प्रधान महालेखापाल कार्यालय नागपूरव्दारे इलेक्ट्रॉनिक पेन्शन पेमेंट ऑर्डर्स (ई-पीपीओ) जारी करण्यात येणार असून, एक पथदर्शी प्रकल्प म्हणून येत्या १ डिसेंबरपासून जिल्ह्यातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांना ई-पीपीओ पाठविले जाणार आहेत.

पेन्शनर्सला अनुकूल असलेल्या या डिजिटल पुढाकाराचा शुभारंभ उद्या, गुरुवारपासून होत आहे. महालेखापाल नागपूर कार्यालयात दुपारी ४ वाजता प्रधान महालेखापाल जया भगत यांच्या उद्घाटन होईल.

ईपीपीओ उपक्रमात कोषागार अधिकाऱ्यांद्वारे पेन्शनचे वितरण सुव्यवस्थित व गतीने होण्याची अपेक्षा आहे. सध्या पेन्शन प्रकरणे निकाली काढल्यानंतर अनेक पानांची व अनेक घड्यांची छपाईपूर्व लेखनसामुग्री पीपीओ छपाईकरिता वापरात येत असते. या पीपीओचे प्राधिकारपत्र सक्षम अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीनंतर प्रधान महालेखापाल कार्यालयाद्वारे शीघ्र डाकेने पाठविले जातात. बऱ्याचवेळा पीपीओ प्राधिकारपत्रे प्रधान महालेखापाल कार्यालयाने पाठविल्यानंतर १० ते १५ दिवसानंतर पेन्शनर, कोषागार अधिकारी व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना प्राप्त होतात. पेन्शनर्सला उत्तम सेवा प्रदान करण्याच्या लोकसेवा प्रयत्नाचा एक भाग म्हणून प्रधान महालेखापाल कार्यालयाद्वारे एक पारदर्शक, सुरक्षित आणि वापरकर्त्यास अनुकूल असे माध्यम म्हणजे ई-पीपीओ या सुविधेचा समावेश करण्यात आला आहे. आता अशी प्राधिकारपत्रे सर्व भागधारकांना त्याच दिवशी प्राप्त होतील.

# 'पेंशन समाधान एक डिजिटल विंडो' उपक्रमाचे उद्या उद्घाटन



**लोकशाही वार्ता / नागपूर**

सेवानिवृत्त शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समाधानासाठी 'पेंशन समाधान एक डिजिटल विंडो' चे २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता प्रधान महालेखाकार कार्यालयातील सभागृहात उद्घाटन होणार आहे.

प्रधान महालेखाकार कार्यालयाच्या वतीने 'पेंशन आपल्या दारी' हा कार्यक्रम विदर्भ व मराठवाडा विभागात आपल्या अधिकार क्षेत्रात वरिष्ठ नागरिकांसाठी पेंशन संबंधित डिजिटल उपक्रम सुरू केला आहे.

या नवीन अभिनव कार्याक्रमात पेंशनधाकरकांना अनुकूल विकल्पासह योजनेत सहभागी करण्यात येणार आहे. या उपक्रमाद्वारे महालेखाकार कार्यालयाचे अधिकारी व्हिडीओ कॉलद्वारे पेंशनधारकांच्या घरी जातील व त्यांच्या पेंशनविषयी समस्या जाणून घेतील. पेंशन समाधान योजनेत सहभागी होण्यासाठी ऑनलाईन अर्ज किंवा पीएजी कार्यालय टोल फ्री क्रमाक १८८२३३७८३४ या इंटरकॉम फोनकॉलच्या माध्यमातून नोंदणी करता येईल.

तरुण भारत
Apla Nagpur | 2023-11-22 | Page- 6
epaper.tarunbharat.net

# ‘पेंशन समाधान एक डिजीटल विंडो’

## अभिनव उपक्रमाचे उद्या उद्‌घाटन

◆ नागपूर, २१ नोव्हेंबर

सेवानिवृत्त शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समाधानासाठी ‘पेंशन समाधान एक डिजीटल विंडो’ चे २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता प्रधान महालेखाकार कार्यालयातील सभागृहात उद्‌घाटन होणार आहे.

प्रधान महालेखाकार कार्यालयाच्या वतीने ‘पेंशन आपल्यादारी’ हा कार्यक्रम विदर्भ व मराठवाडा विभागात आपल्या अधिकार क्षेत्रात वरीष्ठ नागरिकांसाठी पेंशन संबंधित डिजिटल उपक्रम सुरु केला आहे. या नवीन अभिनव कार्यक्रमात पेंशनधारकांना अनुकूल विकल्पासह योजनेत सहभागी करण्यात येणार आहे.

या उपक्रमाद्वारे महालेखाकार कार्यालयाचे अधिकारी विडियो कॉलद्वारे पेंशनधारकांच्या घरी जातील व त्यांच्या पेंशन विषयी समस्या जाणून घेतील.

पेंशन समाधान योजनेत सहभागी होण्यासाठी ऑनलाईन अर्ज किंवा पीएजी कार्यालय टोल फ्री क्रमाक १८८२३३७८३४ या इंटरकॉम फोनकॉलच्या माध्यमातून नोंदणी करता येईल.

◀ (तभा वृत्तसेवा)

Powered by iDocuments

# राज्य कर्मचारियों को इलेक्ट्रॉनिक पेंशन भुगतान

## आज महालेखाकार जया भगत करेंगी शुभारंभ

**नागपुर.** नागपुर क्षेत्र में पेंशन भोगियों के कल्याण में सुधार के लिए प्रधान महालेखाकार कार्यालय नागपुर द्वारा ई-पीपीओ जारी किया जाएगा. एक पायलट प्रोजेक्ट के रूप में 1 दिसंबर से जिले के सेवानिवृत्त सरकारी कर्मचारियों को ई-पीपीओ भेजा जाएगा. यह पेंशन भोगी अनुकूल डिजिटल पहल जया भगत, महालेखाकार के हाथों गुरुवार, 23 नवंबर को शाम 4 बजे महालेखाकार, नागपुर कार्यालय में शुरू की जाएगी. जिसके बाद कोषागार अधिकारियों द्वारा पेंशन का वितरण सुचारू होगा. ईपीपीओ की इस पहल के माध्यम से तेजी इसमें तेजी आएगी. वर्तमान में पेंशन मामलों के निपटारे के बाद पीपीओ प्रिंटिंग के लिए कई पेज और कई घंटों की प्री-प्रिंटिंग सामग्री का उपयोग किया जाता है. इस पीपीओ का प्राधिकार पत्र सक्षम अधिकारी के हस्ताक्षर के बाद प्रधान महालेखाकार कार्यालय द्वारा डाक द्वारा भेजा जाता है. अधिकांश बार पीपीओ प्राधिकरण पत्र महालेखाकार द्वारा प्रेषण के 10 से 15 दिनों के बाद पेंशन भोगियों, ट्रेजरी अधिकारियों और आहरण और संवितरण अधिकारियों को प्राप्त होते हैं. पेंशन भोगियों को बेहतर सेवा प्रदान करने के




ऑडिट भवन नागपुर

सार्वजनिक सेवा प्रयास के एक भाग के रूप में, एक पारदर्शी , महालेखाकार द्वारा सुरक्षित और उपयोगकर्ता के अनुकूल माध्यम प्रदान किया गया है. पीपीओ सुविधा शामिल की गई है. अब ऐसे प्राधिकरण पत्र सभी शेयर धारकों को उसी दिन प्राप्त होंगे, जिस दिन प्राधिकरण पत्र अंतिम हो जाएंगे. पेंशन भोगियों के लिए कभी भी और कहीं भी आसानी से उपलब्ध होंगे. इस ई-पीपीओ की विशेषताएं डिजिटल पीपीओ, सुचारू प्रसंस्करण और तत्काल संवितरण, पेंशन भोगियों को एसएमएस के माध्यम से अधिसूचना के माध्यम से त्वरित जानकारी, महाराष्ट्र सरकार की महाकोश वेबसाइट पर ई-पीपीओ की आसान उपलब्धता हैं. प्रधान महालेखाकार, नागपुर के कार्यालय ने नागपुर क्षेत्र के अन्य जिलों, अमरावती और औरंगाबाद क्षेत्र के जिलों से सेवानिवृत्त होने वाले महाराष्ट्र सरकार के कर्मचारियों को ई-पीपीओ भेजने का भी संकल्प लिया है. सेवानिवृत्त सरकारी अधिकारियों और कर्मचारियों की संतुष्टि के लिए 23 नवंबर को सुबह 11.30 बजे प्रधान महालेखाकार कार्यालय के सभागार में 'पेंशन समाधान एक डिजिटल विंडो' का भी उद्घाटन किया जाएगा. प्रधान महालेखाकार कार्यालय की ओर से विदर्भ और मराठवाड़ा डिवीजन में 'पेंशन आपल्या दारी' कार्यक्रम शुरू किया गया है, जो अपने अधिकार क्षेत्र में वरिष्ठ नागरिकों के लिए पेंशन से संबंधित एक डिजिटल पहल है. इस नये अभिनव कार्यक्रम में पेंशनभोगी एक अनुकूल विकल्प के साथ योजना में भाग लेंगे. इस पहल के माध्यम से, महालेखाकार कार्यालय के अधिकारी वीडियो कॉल के माध्यम से पेंशनभोगियों के घर जाएंगे और उनकी पेंशन संबंधी समस्याओं को जानेंगे. पेंशन संतुष्टि योजना में भाग लेने के लिए, कोई भी ऑनलाइन आवेदन कर सकता है या पीएजी कार्यालय के टोल फ्री नंबर 1882337834 पर इंटरकॉम के माध्यम से फोन कॉल कर पंजीकरण कर सकता है.

# राज्य शासकीय कर्मचाऱ्यांकरिता ई-पीपीओची सुविधा उद्यापासून

**लोकशाही वार्ता / नागपूर**

नागपूर क्षेत्रातील निवृत्तीवेतनधारकांच्या कल्याण वृद्धीकरिता प्रधान महालेखापाल कार्यालय नागपूर यांच्याद्वारे इलेक्ट्रॉनिक पेन्शन पेमेंट ऑर्डर्स (ई-पीपीओ) जारी करण्यात येणार असून, एक पथदर्शी प्रकल्प म्हणून १ डिसेंबर २०२३ पासून नागपूर जिल्ह्यातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांना ई-पीपीओ पाठविले जातील. पेन्शनर्सला अनुकूल असणाऱ्या या डिजिटल पुढाकाराचा शुभारंभ प्रधान महालेखापाल जया भगत यांच्या हस्ते गुरुवार, २३ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता प्रधान महालेखापाल नागपूर कार्यालय येथे होणार आहे. ईपीपीओ या उपक्रमाद्वारे कोषागार अधिकाऱ्यांद्वारे पेन्शनचे वितरण सुव्यवस्थित व गतीने होण्याची अपेक्षा आहे.



सध्या पेन्शन प्रकरणे निकाली काढल्यानंतर अनेक पाने व घड्यांची छपाईपूर्व लेखनसामुग्री पीपीओ छपाईकरिता वापरात येत असते. या पीपीओचे प्राधिकार पत्र सक्षम अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीनंतर प्रधान महालेखापाल कार्यालयाद्वारे शीघ्र डाकेने पाठविले जातात. बऱ्याचवेळा पीपीओ प्राधिकार पत्रे प्रधान महालेखापाल कार्यालयाने पाठविल्यानंतर १० ते १५ दिवसांनंतर पेन्शनर, कोषागार अधिकारी व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना प्राप्त होतात. पेन्शनर्सला उत्तम सेवा प्रदान करण्याच्या लोकसेवा प्रयत्नाचा एक भाग म्हणून प्रधान महालेखापाल कार्यालयाद्वारे एक पारदर्शक, सुरक्षित आणि वापरकर्त्यास अनुकूल असे माध्यम म्हणजे ई-पीपीओ या सुविधेचा समावेश करण्यात आला आहे. आता अशी प्राधिकार पत्रे सर्व भागधारकांना त्याचदिवशी प्राप्त होतील. ज्या दिवशी प्राधिकार पत्रे अंतिम होतील आणि पेन्शनरला केव्हाही व कुठूनही सहज उपलब्ध होतील. डिजिटल पीपीओ, जलदगती प्रक्रिया व तत्काळ वितरण, एस. एम. एस.द्वारे पेन्शनरला सूचनेद्वारे तत्काळ माहिती महाराष्ट्र शासनाच्या 'महाकोष' संकेतस्थळावर ई-पीपीओची सहज उपलब्धता ही या ई-पीपीओची वैशिष्ट्ये आहेत.